नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,
शाखा कार्यालय, अमरावती.

"तट्टे ईमारत " डॉड कंपाउड
कँप,अमरावती.

दुरध्वनी क.०७२१/२६६२०१६
E-mail adtp.amravati@maharashtra.gov.in

दि.४ /०३/२०२०

जा.क्र.अकृषक/मौ.वलगाव भागा-२/ता.व जि.अम./स.नं.१५०/१/ससंनर-अम/ ५३५

प्रति,

तहसिलदार,

अमरावती.

**विषय:-** मौ.वलगाव भाग-२,ता.व जि.अमरावती, येथील स.नं.१५०/१ क्षेत्र १.६७ हे. आर शेत जमिन निवासी प्रयोजनाकरीता अकृषक मध्ये रुंपातरण करण्याबाबत.

**संदर्भ:-** आपले कार्यालयीन पत्र क्र.अका/प्रस्तु-१/नाहअभि/कावि-५२३/२०२०, दि.२६.०२.२०२०.

विषयाकित प्रकरण मौ.वलगाव भाग-२,ता.व जि.अमरावती, येथील स.नं.१५०/१ क्षेत्र १.६७ हे. आर शेत जमिन निवासी प्रयोजनाकरीता अकृषक मध्ये रुंपातरण करण्याबाबत अभिन्यास मंजूरीचे अभिप्रायास्तव संदर्भित पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेल्या विषयांकित जागेच्या अभिन्यास नकाशाची केवळ नगर रचनेच्या दृष्टीकोनातुन छाननी केली असता, अभिन्यास नकाशे सर्वसाधारणपणे बरोबर असल्याने व शासन निर्णयाप्रमाणे अधिमुल्य रक्कम रु.३,७३,४९६/-चा भरणा चलन क्र.०१२६५५२९० ने व विकास शुल्क रक्कम रु.८२,७२५/- चा भरणा चलन क्र.०१२६५६०८७ ने दि.०३.०३.२०२० रोजी सरकारी खजिन्यात केलेला असल्याने सदर अभिन्यासाला खालील अटीं/शर्तीवर सिमांकनासाठी तात्पुरती शिफारस (Recommended for Demarcation) करण्यात येत आहे.

१) सदरची शिफारस ही फक्त सिमांकनासाठी ( Recommended for Demarcation) करण्यात येत आहे.

२) विषयांकित प्रकरणांतर्गत जागेच्या अधिकृत मालकी हक्क व पोट हिस्याबाबत महसुल विभागाने प्रथमत: शहानिशा करुन पुढील कार्यवाही करावी.

३) महसुल विभागाकडुन सिमांकनासाठीच्या मंजुरीसंबंधाने निर्णय झाल्यानंतरच प्रस्तुत अभिन्यासाची प्रत्यक्ष जागेवर संबंधित भुमी अभिलेख विभागामार्फत आखणी करण्यात यावी. अशा आखणीवेळी प्रस्तुत प्रकरणामधील नियोजित अभिन्यासामधील नियोजित रस्त्याशी लगतच्या सर्व अस्तित्वातील रस्त्याशी समन्वये साधला आहे किंवा कसे? याची प्रथमत: भुमी अभिलेख विभागाने खातरजमा करणे आवश्यक आहे. तशी खातरजमा झाल्यानंतरच व प्रत्यक्ष जागेवर आखणी केल्यानंतरच जरुरीप्रमाणेच्या दुरुस्त्यांसह भुमी अभिलेख विभागाने प्रमाणित केलेला सिमांकनाचा मुळ नकाशा व त्यानुसार निलमुद्रित नकाशाच्या चार प्रती अंतीम शिंफारशीकरीता विहितरित्या सादर करणे आवश्यक आहे व राहिल.

४) जागेवर आखणी करताना जागेच्या लगतच्या जमिनधारकांचे हितसंबंध बाधित होत असल्यास व त्याबाबत कोणताही वाद उदभवल्यास व अशा वादामध्ये तथ्य आढळल्यास सदरची सिमांकनाची तात्पुरती शिफारस तात्काळ व आपोआप रद्द समजण्यात येईल.

५) सदरहू प्रकरणात अभिन्यास नकाशांना मंजूरीची शिफारस करताना अर्जदार जमिनमालक/विकासकर्ते यांनी प्रकरणासोबत दाखल केलेली मालकी हक्कांची कागदपत्रे व मोजणी नकाशा इ.कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहेत. सदर कागदपत्रे बोगस व दिशाभुल करणारे आढळल्यास व उक्त अट क्र.४ नुसार तथ्य आढळल्यास सदर सिमाकंनासाठी तात्पुरती शिफारस तात्काळ व आपोआप रद्द समजण्यात येईल. त्याचबरोबर भविष्यकाळात या अनुषंगाने कोणतीही तक्रार वा न्यायालयीन वाद उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार जमिनमालक/ विकासकर्ते यांची राहील व तशा तक्रारीस वा न्यायालयीन वादास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६) सदरची सिमांकनाकरिता केलेली शिफारस ही अकृषक आकारणी व तद्नुषंगिक पुढील कार्यवाही करिता या कार्यालयाकडील शिफारस किंवा ना- हरकत म्हणुन गृहीत धरता येणार नाही.

D/KH/DA/All atp/8Condition

७) अभिन्यास नकाशाला सिमांकनाकरिता दिलेली तात्पुरती शिफारस ही नगर रचनेच्या दृष्टीकोनातुन केवळ तांत्रिक स्वरुपाची असून अकृषक आकारणी व तद्नुषंगिक पुढील कार्यवाही करीता संबंधित महसुल अधिका-यांकडे विहित प्रकरण विहितरित्या दाखल करणे अर्जदार जमिनमालक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक आहे व राहिल.

८) अभिन्यासात असलेली ११ के.व्ही/३३ के.व्ही. ची विद्युत वाहीनी रस्त्याच्यां कडेला स्थलांतरीत करण्यात यावी अथवा काढून टाकण्यात यावी अन्यथा नियमाप्रमाणे योग्य ती सुरक्षा अंतरे विचारात घेवूनच विकास कामे करणे अर्जदार जमिनमालक/ विकासकर्ते यांचेसह सर्व संबंधितावर बंधनकारक राहील.

९) सदरहू अभिन्यासालगतच्या सर्व मंजूर अभिन्यासातील रस्त्याचा आणि विषयांकित अभिन्यासातील रस्त्याचा योग्य समन्वय साधण्यात यावा व रस्त्याचे खडीकरण करण्यात यावे. प्रस्तुत प्रकरणामधील नियोजित रेखांकनाच्या जागेमधील सांडपाणी/पावसाचे पाणी इत्यादीचा योग्यप्रकारे नियोजन करुन निचरा होणे आवश्यक असल्यास त्याबाबतची सर्वकष दक्षता घेण्याची जबाबदारी जमिनमालक/विकासकर्त्यांची राहील.

१०) जागेचा नकाशात नमूद असलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य वापर बदलावयाचा झाल्यास अशा प्रस्तावित वापर बदलास विहितरित्या पुर्व परवानगी घेणे अर्जदार जमिनमालक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

११) प्रस्तावित प्रकरणातील नियोजित रेखांकनातील गणितिय आकडेमोडीत चुका आढळल्यास त्या दुरुस्त करुन घेणे अर्जदार विकासकर्त्यांसह वास्तुतज्ञांवर बंधनकारक राहील.

सिमांकनाकरिता तात्पूरती शिफारस केलेल्या अभिन्यास नकाशाच्या तिन प्रती यासोबत पाठवित आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

(घ.वा. वाघाडे)
सहायक संचालक,
**नगर रचना, अमरावती शाखा.**

D/KH/DA/All atp/8Condition